ePaper

## इस्रायलचा कच्च्या तेलाच्या साठ्यांवरच हल्ला; सर्वत्र पसरला काळोख



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

महापालिकेचा 13,995 कोटींचा अर्थसंकल्प

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 10 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### भारताकडून इंडोनेशिया खरेदी करणार ब्राह्मोस क्षेपणास्त्र; करारावर शिक्कामोर्तब

# ‘ब्रह्मोस’चा जगात डंका!

**महाईन्यूज ।** नवी दिल्ली

**भारताला सर्वाधिक शस्त्रांची आयात करणारा देश म्हणून आधी ओळखलं जायचं. मात्र, आता हे चित्र काहीसं बदलल्याचं दिसत आहे. भारताने विकसित शस्त्रांची निर्यात वाढवल्याचं दिसून येत आहे. कारण आता इंडोनेशिया भारताकडून ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करणार आहे. भारत आणि इंडोनेशियामध्ये २०० ते ३५० दशलक्ष डॉलर्सच्या दरम्यान ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब झालं आहे.**




भारत आणि इंडोनेशियामध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र करारावर शिक्कामोर्तब झालं असून इंडोनेशियाच्या संरक्षण मंत्रालयाने या कराराची माहिती दिल्याचं वृत्त रॉयटर्सने दिलं आहे. दरम्यान, भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी २०२३ मध्ये इंडोनेशियाकडून चर्चा सुरू झाल्या होत्या. दरम्यान, याआधी २०२२ मध्ये फिलिपिन्ससोबतही पहिला ब्रह्मोस क्षेपणास्त्राचा विदेशी करार झाला होता.

भारताने याआधी ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा फिलिपिन्सबरोबरही करार केलेला आहे. फिलिपिन्सबरोबरचा करार म्हणजे भारताची आजवरची पहिली मोठी संरक्षण निर्यात ऑॅर्डर होती. फिलिपिन्सच्या राष्ट्रीय संरक्षण विभागाने ३७४.९६ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २,७०० कोटी रुपयांच्या या कराराला मान्यता दिली होती.




## क्षेपणास्त्र निर्मितीत डीआरडीओचं योगदान

क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये संरक्षण, संशोधन व विकास संस्थेचा (डीआरडीओ) वाटा सर्वाधिक आहे. १९८०च्या दशकात सुरू झालेल्या या निर्मितीची साक्षीदार ही संस्था आहे. आता खासगी क्षेत्र आणि इतर सरकारी कंपन्याही विविध प्रकल्पात सहभागी झाल्या आहेत. संभाव्य धोक्यांचा विचार करून भारतामध्ये क्षेपणास्त्रे तयार केली गेली आहेत.

## क्षेपणास्त्र निर्मितीत आत्मनिर्भर

भारत संरक्षण क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरतेला महत्त्व देत आहे. या आत्मनिर्भरतेत सर्वांत महत्त्वाचा उल्लेख करावा लागेल, तो क्षेपणास्त्रांचा. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानामध्ये आपण आत्मनिर्भरता गाठलेली आहे. आपण क्षेपणास्त्रांची निर्मितीच नव्हे, तर निर्यातही करतो. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता वाढत आहे. संरक्षण उत्पादनासाठी लागणाऱ्या साहित्यापैकी ६० टक्क्याहून अधिक भाग देशी बनावटीचा आहे. क्षेपणास्त्रप्रणालीतील आत्मनिर्भरतेमुळे भारताच्या एकूण संरक्षणसिद्धतेला कमालीचे बळ आले आहे. या क्षेपणास्त्र प्रणालीमध्ये अग्नी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रापासून, ब्राह्मोस क्रूझ क्षेपणास्त्रे आणि इतर छोट्या क्षेपणास्त्रांचाही समावेश आहे.

# महापालिकेचा 13,995 कोटींचा अर्थसंकल्प

## पाणीपुरवठ्यासाठी सर्वाधिक २०७७ कोटी; रस्ते, स्वच्छता व वाहतूक प्रकल्पांवरही भर

**महाईन्यूज । पुणे**

**राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे महापालिकेचा चालू २०२६- २७ चा अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा अर्थसंकल्प सादर केला आहे.पुणे महापालिका आयुक्त यांनी १३ हजार कोटी रुपयांचं अंदाजपत्रक सादर केलं आहे. यामध्ये पुणे महापालिकेत पाणीपुरवठा विभागासाठी सर्वाधिक २०७७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**




पुणे पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्थायी समिती समोर अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये महापालिकेचे 2026-27 या आर्थिक वर्षासाठी 13 हजार 995 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले आहे. पुणे शहरातील वाहतूक नियोजन आणि प्रकल्पासाठी ७४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर पाणीपुरवठा विभागासाठी सर्वाधिक २०७७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर मलनिस्सारण प्रकल्पाला १२१६ कोटी, घनकचरा व्यवस्थापनासाठी १३९० कोटी तर पथ विभागाला १८६६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

पुणे शहरातील महत्त्वाचे रस्ते, वाहतूक कोंडी कमी करणे तर उड्डाणपूल, नदीवरील पूल, रेल्वे पुलांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे शहरातील पाच रस्त्यावर अँड पार्कचे नियोजन करण्यात आले आहे. रस्त्यावरील अनाधिकृत पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पे अँड पार्क राबवले जाणार आहे. पावसाळ्यापूर्वी पुणे शहरातील तीन पुलांचे काम पूर्ण होणार आहे. घोरपडी रेल्वे पूल, आगाखान नदीवरील पूल, सनसिटी कर्वेनगर नदीवरील पूल पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### अर्थसंकल्पामध्ये पुणेकरांना काय?

- प्राथमिक शिक्षण विभागासाठी तब्बल ९७९ कोटी रुपयांची तरतूद
- भवन रचना विभासाठी ६५० कोटी विद्युत विभाल २६५ कोटी रुपयांची तरतूद,
- समाज विकासाला १४३.५० कोटी रुपयांची तरतूद
- उद्यान विभागाला २०५ कोटी रुपयांची तरतूद
- आरोग्य विभागासाठी ८८ कोटी रुपयांची तरतूद
- नगर रचना नियोजनासाठी ६४.५० कोटी रुपयांची तरतूद
- पर्यावरण विभागाला ५१.५९ कोटी रुपयांची तरतूद माहिती व तंत्रज्ञान विभागाला ५६.७३ कोटी रुपयांची तरतूद
- हेरिटेज सेलसाठी २८.५० कोटी रुपयांची तरतूद
- पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक केंद्र विभागाला १७१.३१ कोटी रुपयांची तरतूद

### कोणत्या विभागाला किती निधी?

**पाणीपुरवठा – २०७७ कोटी**
पुणे महानगरपालिकेकडून सर्वात जास्त निधीची तरतूद पाणीपुरवठा विभागासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे जुनी पाईपलाइन आणि अपुरा पाणीपुरवठा याचा त्रास पुणेकरांना कमी होणार आहे.

**पथ विभाग – १८६६ कोटी**
पुणे शहरातील खड्डे आणि खराब रस्ते यासाठी १८६६ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली असून रस्त्यांचे नूतनीकरण करून पुणेकरांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**घनकचरा व्यवस्थापन – १३९० कोटी**
महानगरपालिकेच्या निधीच्या तरतुदीत स्वच्छ पुणे साठी वाव देण्यात आला आहे. त्यामुळे अपुरी स्वच्छता, गल्ल्यांमध्ये कचरा न दिसता स्वच्छ शहर आणि आरोग्य सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे.

**मलनिस्सारण प्रकल्प – १२१६ कोटी**
शहरातील जुने मलनिस्सारण, पाणी साचणे या समस्या आता कमी होऊन पावसाळ्यात पूराचा धोका कमी होईल, जलवाहिन्यांची सुधारणा होईल याची पुणेकरांना अपेक्षा आहे.

**वाहतूक नियोजन – ७४० कोटी**
पुण्यातील सर्वांनाच त्रासदायक ठरणारी ट्रॅफिक जाम समस्या अपुरी बस सेवा अशा वाहतुकीच्या समस्या कमी होऊन प्रवासाचा वेळ कमी, वाहतूक सुकर होण्याची पुणेकर अपेक्षा करत आहेत.

**प्राथमिक शिक्षण – ९७९ कोटी**
शहरातील जुनी शाळा, अपुऱ्या सुविधा कमी होऊन पुणेकरांना सुरक्षित आणि दर्जेदार शिक्षण मिळेल याची अपेक्षा आहे.

# सावधान! लोणावळा, मावळात बसवले हायटेक ‘लेझर स्पीड कॅमेरे’

**महाईन्यूज । पुणे**

**वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध पुणे ग्रामीण पोलिसांकडून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वडगाव मावळ, लोणावळा येथे अत्याधुनिक लेझर स्पीड कॅमेरे बसविण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांमुळे भरधाव वाहन चालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. ‘महामार्गावर होणारे बहुतांश अपघात वेग आणि वाहन चालकांच्या चुकांमुळे घडतात. बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध कारवाई, तसेच अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून लेझर स्पीड कॅमेऱ्यांचा वापर सुरू करण्यात आला आहे.**




जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर लोणावळा, वडगाव मावळ परिसरात हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ब्लूमबर्ग फिलान्थ्रॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी आणि ग्लोबल रोड सेफ्टी पार्टनरशिप या संस्थांकडून सहाकार्य करण्यात आले आहे’, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली.

‘लोणावळा, वडगाव मावळ परिसरात तीन ठिकाणी हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे कॅमेरे दिवसा आणि रात्रीही कार्यान्वित राहतात. कॅमेऱ्यांकडून वाहनांचा अचूक वेग नोंदविला जातो. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांचा ३२० किलोमीटर प्रतितासापर्यंतचा वेग नोंदविण्याची क्षमता या उपकरणांमध्ये आहे’, असे गिल यांनी नमूद केले.

### अपघातात पादचारी, दुचाकीस्वारांचे मृत्यू

पुणे जिल्ह्यात गंभीर स्वरुपाचे अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे. अपघातांमध्ये दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांचे मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे भरधाव मोटार, ट्रक चालकांविरुद्ध कारवाईसाठी अशा प्रकारचे कॅमेरे उपयुक्त ठरणार आहेत. अशी माहिती पोलिसांनी दिली.

> वडगाव मावळ, लोणावळ्यात प्रायोगिक तत्वावर हे कॅमेरे बसविण्यात आले आहे. हे कॅमेरे वेगमर्यादा उल्लंघन करणाऱ्या वाहनांचे छायाचित्र, तसेच चित्रीकरण करु शकतात, तसेच हेल्मेट न वापरणारे दुचाकीस्वार, वाहन चालविताना मोबाइलचा वापर अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कारवाई करणे शक्य होणार आहे.
>
> – संदीपसिंग गिल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

# शहरातील वायू प्रदूषणावर कडक नियंत्रण

## आर.एम.सी. प्लांट आणि बांधकाम स्थळांवर कठोर उपाययोजना आदेशित

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने सर्व आर.एम.सी. (READY MIX CONCRETE) प्लांट, बांधकाम स्थळे आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांसाठी कडक आदेश जारी केले आहेत.**





महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार धूळ आणि वायू प्रदूषण नियंत्रणासाठी ठरवलेल्या उपाययोजनांचे काटेकोर पालन करणं अनिवार्य आहे. मात्र काही ठिकाणी या नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

शहरातील हवेची गुणवत्ता निर्देशांक (AQI) मोजणी नोंदींनुसार सध्या शहरातील हवेची गुणवत्ता मध्यम (AQI १०० ते १५०) श्रेणीत आहे. या पार्श्वभूमीवर, पिंपरी-चिंचवड मनपा सर्व संबंधित आस्थापनांना धूळ व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना तात्काळ राबविण्याचे आवाहन करत आहे.

पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले की, "सर्व आर.एम.सी. प्लांट धारक, बांधकाम व्यावसायिक आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांनी नियमांचे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात येईल. आवश्यक असल्यास संबंधित आस्थापना सील केली जाईल आणि उपाययोजना पूर्ण न झाल्यास ती बंद ठेवली जाईल." महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांमार्फत नियमित तपासणी केली जाणार असून, नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी ही कारवाई अत्यंत महत्वाची आहे.

> "पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे आमचा सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे सर्व आर.एम.सी. प्लांट, बांधकाम स्थळे आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांनी धूळ व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी ठरवलेले उपाय तात्काळ राबवावेत. नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करणे अपरिहार्य आहे, आणि गरज भासल्यास आस्थापना सील करण्याची पावलं उचलली जातील.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग.

# शहरातील नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करा; महापौर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक कानाकोपऱ्यात नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रभागांमधील स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देत अतिक्रमणांवर प्रभावी कारवाई करणे, कचरा संकलन, नालेसफाई तसेच रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.**



यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय वाढवून नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत अतिक्रमण, कचरा संकलन, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची नियमित साफसफाई, नालेसफाई तसेच स्वच्छतेसंबंधित आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन निगडी येथील अ क्षेत्रीय कार्यालय येथे करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

पिंपरी चिंचवड शहरातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यावर विशेष भर देण्यात आला. शहरातील अतिक्रमण , कचरा संकलन, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची नियमित साफसफाई, नालेसफाई तसेच स्वच्छतेसंबंधित कामे अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महापौर रवी लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, माजी उप महापौर शैलजा मोरे, नगरसदस्य मंदार देशपांडे, कुशाग्र कदम, नगरसदस्या सुप्रिया चांदगुडे,सविता आसवानी, अरुणा लंगोटे, वैशाली काळभोर, अनुराधा गोरखे तसेच आरोग्य विभागाचे उपआयुक्त प्रदीप ठेंगल, प्रशासन अधिकारी प्रिया गोरखे, कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण) सुनील पवार, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, योगेश आल्हाट लक्ष्मीकांत कोल्हे, महेश बरीदे, वैशाली ननवरे, दिलीप भोसले, सोहन निकम, सचिन लोणे, उमेश बाकले, अमोल धडस, ऋषिकेश सामंत, किरण फड, सहाय्यक आरोग्य अधिकारी, उपअभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करणे तसेच विभागांमधील समन्वय वाढवून विकासकामांना गती देणे या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

### प्रलंबित कामांना प्राधान्य द्या : महापौर

अ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी, प्रलंबित कामांची सद्यस्थिती तसेच पुढील नियोजित विकासकामांबाबत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली. बैठकीदरम्यान तसेच शहरातील रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विकासकामांचा आढावा घेऊन ती कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याबाबतही स्पष्ट सूचना करण्यात आल्या. विभागांमधील समन्वय वाढवून कामकाज अधिक कार्यक्षम पद्धतीने राबविणे, नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करणे आणि प्रलंबित कामांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही महापौर लांडगे यावेळी नमूद केले.



## भूमिका

**मध्यपूर्वेतील अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष नवव्या दिवसात पोहोचला असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका विधानाने जगाचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर त्यांनी दावा केला की इराण 'पूर्णपणे हरला' असून त्याने माफी मागत शरणागती पत्करली आहे.**

# बेजबाबदार नेतृत्व

इतकेच नव्हे तर इराणने 'थँक्यू प्रेसिडेंट ट्रम्प' असेही म्हटल्याचे त्यांनी सांगितले. युद्धासारख्या संवेदनशील परिस्थितीत राष्ट्रप्रमुखांकडून येणारी माहिती विश्वासार्ह असणे अपेक्षित असते.

मात्र ट्रम्प यांच्या या दाव्यात अतिशयोक्ती आणि राजकीय नाट्यमयता स्पष्ट दिसते. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाच्या गांभीर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ट्रम्प यांच्या ट्रूथ सोशलवरील पोस्टमध्ये ते म्हणतात की इराणने बिनशर्त माफी मागितली आहे आणि त्यानंतर त्यांनी इराणला पुन्हा 'ग्रेट' बनवण्याचे आश्वासनही दिले. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. इराणच्या हल्ल्यांमुळे त्यांच्या प्रदेशात क्षेपणास्त्र पडल्याने राष्ट्रपती मसूद यांनी शेजारील सौदी अरेबिया आणि युएई यांची क्षमा मागितली. ही माफी इराणच्या हल्ल्यामुळे झालेल्या परिणामांबद्दल होती; ती शरणागती नव्हती. त्यामुळे ट्रम्प यांनी सांगितल्याप्रमाणे इराणने अमेरिकेसमोर माफी मागितल्याचा कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नाही.

उलट, ट्रम्प यांच्या विधानानंतर इराणने आणखी क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. अमेरिकन आणि इस्रायली लक्ष्यांवर मिसाईल्स डागण्यात आली. यावरून संघर्ष संपलेला नसून तो अधिक तीव्र होत असल्याचे स्पष्ट होते. या युद्धाची सुरुवात फेब्रुवारीच्या अखेरीस झाली, जेव्हा अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या अणुकार्यक्रमावर आणि अंतर्गत दडपशाहीविरोधात लष्करी कारवाई केली. 28 फेब्रुवारीला झालेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई ठार झाल्याचे वृत्त आले. त्यानंतर इराणने प्रत्युत्तरादाखल



क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले सुरू केले. अमेरिकन सेंट्रल कमांडनुसार 30 हून अधिक इराणी युद्धनौका नष्ट करण्यात आल्या आहेत, ज्यात एक मोठी ड्रोन कॅरियरही आहे. इस्रायलने तेहरानमधील लष्करी केंद्रांवर बॉम्बहल्ले केले, ज्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. तरीही इराणची लष्करी क्षमता संपलेली नाही. ते अजूनही 'इमाद' आणि 'घद्र' सारखी बलिस्टिक मिसाईल्स वापरत आहेत, ज्यांनी इस्रायलच्या आयर्न डोम संरक्षण व्यवस्थेलाही आव्हान दिले आहे.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या अहवालानुसार तेहरानमध्ये मोठे स्फोट झाले असून इराणने स्ट्रेट ऑफ होर्मुझमध्ये अमेरिकन जहाजांना आव्हान दिले आहे. इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड्सने ट्रम्प यांना थेट इशारा दिला आहे. यावरून इराण शरणागतीसाठी तयार नसल्याचे स्पष्ट होते. उलट, ते या संघर्षाचे परिणाम स्वीकारण्यास तयार असल्याचे सांगत आहेत.

ट्रम्प यांचे विधान मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असल्याची टीका होत आहे. अमेरिकेतील जनमत आपल्याकडे वळवण्यासाठी ते अशा प्रकारचे दावे करत असल्याचे अनेक विश्लेषकांचे मत आहे. मात्र अशा विधानांमुळे वास्तव परिस्थिती अस्पष्ट होते आणि चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता वाढते.

या संघर्षाचे परिणाम मध्यपूर्वेपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. तेलाच्या किमती वाढल्या आहेत, समुद्री वाहतूक धोक्यात आली आहे आणि हजारो प्रवासी विविध देशांत अडकले आहेत. भारतासारख्या देशांवरही याचा आर्थिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या संघर्षाचा शेवट विजय-पराभवात नव्हे, तर संवाद आणि मुत्सद्देगिरीतून होणे अधिक आवश्यक आहे.

जागतिक राजकारणात विश्वास ही सर्वात मोठी भांडवल असते. त्यामुळे युद्धासारख्या गंभीर परिस्थितीत नेत्यांनी संयम, गांभीर्य आणि वास्तववादी भूमिका घेणे आवश्यक आहे. ट्रम्प यांचे विधान मात्र या निकषांवर अपयशी ठरते. युद्धभूमीवर ताकद जितकी महत्त्वाची असते, तितकेच शब्दांतील जबाबदारीही महत्त्वाची असते. अन्यथा इतिहास अशा नेतृत्वाची नोंद शक्तिशाली म्हणून नव्हे, तर बेजबाबदार म्हणूनच करतो.

## प्रासंगिक »

### विवेकानंदांची एकाग्रता

***स्वामी विवेकानंद जर्मनीला गेले होते. तेथे कील शहरात त्यांनी काही काळ व्यतीत केला. यादरम्यान कील विद्यापीठातील संस्कृत विभागाचे प्रमुख पॉल डायसन यांची विवेकानंदांशी भेट झाली.***

डॉयसनना स्वामीजींची विद्वत्ता माहिती होती. दोघांत बराच वेळ चर्चा झाली. यादरम्यान डॉयसन काही कामासाठी बाहेर निघून गेले. त्यांच्या अनुपस्थितीत स्वामीजी एक पुस्तक वाचू लागले. डॉयसन परतले तरीही स्वामीजी पुस्तक वाचण्यात इतके गढून गेले होते की डॉयसन तेथे आल्याचेही त्यांच्या लक्षात आले नाही. काही वेळाने त्यांचे वाचन पूर्ण झाल्यावर स्वामीजींनी पुस्तक बाजूला ठेवले व डॉयसन यांना समोर बसलेले त्यांनी पाहिले. स्वामीजींनी अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल क्षमा मागितली मात्र डॉयसन यांनी स्वामीजींच्या एकाग्रतेला व ज्ञान मिळविण्याच्या प्रयत्नांना नमस्कार केला.

तात्पर्य :
ज्ञानप्राप्तीसाठी एकाग्र होणे गरजेचे आहे.

दिल्लीतील गाजलेल्या मद्य घोटाळा प्रकरणातून अरविंद केजरीवाल यांची झालेली निर्दोष मुक्तता देशाच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण करू शकते.

# केजरीवाल, नवा नटवरलाल

पुढील वर्षात आणि 2027 मध्ये अनेक राज्यांच्या निवडणुका होणार असल्याने या निर्णयाचे दूरगामी राजकीय परिणाम दिसू शकतात. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांसह काँग्रेसमध्येही अस्वस्थता असल्याचे दिसते.

काही राजकीय विश्लेषकांच्या मते, केजरीवाल पुन्हा सक्रिय झाले असले तरी त्यांचा अर्थ ते पुन्हा सत्तेत येतीलच असे नाही. आंदोलनातून पुढे आलेले साधेभोळ्या प्रतिमेचे नेते म्हणून ओळखले जाणारे केजरीवाल आज वेगळ्या राजकीय वास्तवात उभे आहेत. एकेकाळी काँग्रेसविरोधी आंदोलनातून उभा राहिलेला आम आदमी पक्ष आता राष्ट्रीय राजकारणात स्वतःची वेगळी जागा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

राजकीय वर्तुळात असा समज आहे की आम आदमी पक्ष अनेकदा काँग्रेसच्या मतांमध्ये विभाजन घडवून अप्रत्यक्षपणे भाजपला फायदा



करून देतो. गोवा, गुजरातसारख्या राज्यांमध्येही अशी चर्चा झाली आहे. त्यामुळे विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीत केजरीवाल यांची भूमिका नेहमीच वादाचा विषय राहिली आहे.

दिल्लीमध्ये सत्तेत असताना केजरीवाल यांनी शिक्षण, आरोग्य आणि वीजसवलतीसारख्या लोककल्याणकारी योजनांमुळे वेगळी राजकीय ओळख निर्माण केली. मात्र 'शीश महल' प्रकरण आणि मद्य घोटाळ्याच्या आरोपांमुळे त्यांच्या साधेपणाच्या प्रतिमेला धक्का बसल्याचेही मानले जाते. तसेच पक्षातील प्रशांत भूषण, योगेंद्र यादव यांसारख्या संस्थापक नेत्यांशी झालेल्या मतभेदांमुळे आम आदमी पक्षावर केजरीवाल यांचेच वर्चस्व असल्याची टीका होते.

तथापि काही राजकीय जाणकारांच्या मते, केजरीवाल अजूनही राष्ट्रीय राजकारणात प्रभावी भूमिका बजावू शकतात. ते विरोधी पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतील तर राजकारणात नवे समीकरण तयार होऊ शकते. मद्य घोटाळ्याच्या वादानंतर काही काळ राजकीयदृष्ट्या अडचणीत आलेले केजरीवाल आता पुन्हा मैदानात उतरले आहेत.

पुढील काळात त्यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत. दिल्ली उच्च न्यायालयात या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे. तसेच पंजाबमधील आगामी निवडणुका आम आदमी पक्षासाठी मोठी कसोटी ठरणार आहेत. त्यामुळे केजरीवाल यांचे पुढील राजकारण आणि त्यांची रणनीती देशाच्या राजकारणावर किती परिणाम करेल, हे येणारा काळच ठरवणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ।।१।।

तुळसीहार गळा कासे पीतांबर ।
आवडे निरंतर हेचि ध्यान ।।२।।

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नाशिकमध्ये 'म्हाडा'ची फसवणूक

## ४९ जागा मालक आणि विकासकांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाईन्यूज । नाशिक**

**चार हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या जमिनीचे प्रत्यक्षात विभाजन झालेले नसताना आणि नियमानुसार मोजणी झालेली नसताना जमीन मालक, विकासकांनी भूमी अभिलेख कार्यालयाची बनावट स्वाक्षरी, शिक्के, नकाशे, आकार फोड पत्रक (अर्ज क्रमांक १२) अशी कागदपत्रे खरी असल्याचे भासवत उपरोक्त क्षेत्राचे तुकडे केले आणि म्हाडा, महसूल व भूमी अभिलेख विभागासह शासनाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.**




### नियमाला वळसा

प्रत्यक्षात विभाजन आणि नियमानुसार मोजणी झालेली नसताना भूमी अभिलेख कार्यालयाच्या बनावट स्वाक्षरी, शिक्क्यांचा वापर करून बनावट मोजणी नकाशे अभिलेख दुरुस्तीसाठी आवश्यक कागदपत्रे तहसील कार्यालयाकडे सादर करून जमीन मालक व प्रकल्प विकासकांनी संगनमताने चार हजार चौरस मीटर किंवा त्यापेक्षा प्रमाणपत्र क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे केले आणि सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेसाठी २० टक्के क्षेत्र उपलब्ध करून दिले नसल्याचे दिसत आहे.

शहरातील वेगवेगळ्या भागात हे उद्योग करणाऱ्या ४९ जागा मालक आणि विकासकांविरुद्ध सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुंभनगरी म्हणून पूर्वापार ओळख असलेले नाशिक हे देशात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये आघाडीवर आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, पर्यटनामुळे मागील काही वर्षात जमीन, भूखंडांना सोन्याचे भाव मिळू लागले, तसे गैरप्रकार वाढल्याचे अनेक घटनांमधून दिसून येते. बांधकाम व्यावसायिक, विकासक आणि जागा मालकांनी शासकीय धोरणाला खुंटीवर टांगण्यासाठी केलेले उद्योग हा देखील यातील एक भाग असल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले आहे.

शासनाच्या सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत नाशिक महापालिका क्षेत्रातील चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या गृह प्रकल्पात २० टक्के सदनिका आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. ही घरे बांधून नंतर ती म्हाडाकडे वर्ग करावी लागतात. विकासकांनी म्हाडाला ही घरेच दिली नसल्याचा विषय काही वर्षांपूर्वी विधानसभेत गाजला होता. या प्रकल्पांची माहिती न दिल्यावरून म्हाडा-महापालिकेत बेबनाव झाले होते. जमीन मालक, विकासक व बांधकाम व्यावसायिकांनी बांधकाम प्रकल्प विकसनाची परवानगी घेताना कायदेशीर तरतुदींची योग्य प्रकारे अमलबजावणी केली की नाही, याबाबत म्हाडाने शंका उपस्थित केली होती.

या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाने अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली. त्यामध्ये अन्य अधिकाऱ्यांसह भूमी अभिलेख नाशिक हे समितीचे सदस्य होते. या चौकशीतून शासकीय धोरणानुसार सदनिका देण्याची वेळ येऊ नये म्हणून जागा मालक व विकासकांनी गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आठ नोव्हेंबर २०१३ रोजी आणि नंतर हिस्सा अर्ज क्रमांक १२ होऊन चार हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्राचे तुकडे करून ते चार हजार चौरस मीटरपेक्षा कमी केल्याबाबत म्हसरूळ, वडनेर दुमाला, देवळाली, आडगाव, आगरटाकळी, विहितगाव, नाशिक, नांदूर दसक, पंचक, गंगापूर, चेहेडी येथील १०८ प्रकरणांची तपासणी नाशिक तहसीलदार कार्यालयाने करीत चौकशी समितीला माहिती सादर केली होती. या प्रकरणांची भूमी अभिलेख आणि नगर भूमापन अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पडताळणी झाली. तेव्हा ४९ प्रकरणांमध्ये आठ नोव्हेंबर २०१३ पूर्वी पोटहिस्सा झालेली नसताना तशी मोजणी झाल्याचे भासवून बनावट मोजणी नकाशे तहसीलदार कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

# कुडाळच्या शाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांना अभिनयाचे धडे

**महाईन्यूज । कुडाळ**

**ग्रामिण भागात अभिनय कार्यशाळेच्या माध्यमातून चिमुकल्यांमधील अभिनय कौशल्य, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता वाढवण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे अभिनय क्षेत्रातील उद्याचे उत्तम व हाडाचे कलाकार निर्माण करण्यासारखे आहे, अभिनय म्हणजे फक्त संवाद नव्हे, तर भाव, देहबोली आणि आत्मविश्वास यांचा सुंदर संगम आहे.**



हे मुलांना अतिशय सोप्या आणि रंजक पद्धतीने यानिमित्ताने शिकवता आले, मुलांच्या सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना व्यक्त व्हायला शिकवणे हेच खरे कार्यशाळेचे उद्दिष्ठ असल्याचे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार प्राप्त अभिनेत्री नयना आपटे यांनी बोलताना व्यक्त केले.

कुडाळ ता. जावळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळेत माता अनुसया प्रोडक्शनचे दिग्दर्शक प्रवीण कुमार भारदे व अभिनेत्री नयना आपटे यांनी शाळेला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी भन्नाट विनोदी अभिनय कार्यशाळा आयोजित केली होती.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आवाज, संवाद कौशल्ये आणि अभिनयाच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण देण्यात आले, तसेच मुलांना रंगमंचावरील शिस्त, सादरीकरणाची ताकद आणि विनोदातून व्यक्त होण्याची कला शिकवली. यावेळी खळखळून हसत- खेळत मुलांनी अभिनयाचे धडे घेतले. यावेळी बोलताना दिग्दर्शक प्रवीण भारदे म्हणाले, या कार्यशाळेतून विद्यार्थांचा आत्मविश्वास वाढवून रंगमंचावरील भीती घालवणे हा मुख्य हेतू होता, तसेच भावभिनय, आवाज काढणे, संवाद फेक, गाणी आणि छोट्या नाटिका ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला चालना मिळते. भावभिनय व संवाद यांमुळे मुलांचे भावनिक बुद्ध्यांक वाढवण्यासाठी अभिनयाचा वापर केला जातो, कार्यशाळेच्या शेवटी सहभागी झालेल्या सर्व मुलांसाठी त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण व मुक्त नृत्य घेण्यात आले यावेळी शाळेच्या वतीने दोन्ही प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक सचिन पवार यांनी यावेळी प्रास्ताविक केले तर सौ. अंजली गोडसे यांनी आभार मानले.

अनं...शाळेचा प्रत्येक कोपरा हास्याने, टाळ्यांच्या गजराने आणि उर्जेने भारावून गेला खरं तर विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा नव्हतीच तो तर आनंदाचा उत्सव होता, मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेलं हास्य, त्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि अभिनयातील सहजता हे सर्व पाहताना मन अभिमानाने भरून आल्याचे शिक्षक व पालकांनी सांगितले.

आज यानिमित्ताने शाळेचा प्रत्येक कोपरा हास्याने, टाळ्यांच्या गजराने आणि सर्जनशीलतेच्या उर्जेने भारावून गेला होता, अभिनय शिकताना मुलांनी फक्त हसणं शिकलं नाही, तर आत्मविश्वासाने जगण्याची कला देखील शिकल्याचे पहावयास मिळाले. या कार्यशाळेतून कुडाळ शाळेतील विद्यार्थीनी कु.दुर्वा पाटील हिला कॉमेडीची चेटकीण व मला आई बाबा हवेत या दोन नाटकाच्या प्रयोगात अभिनय करण्याची संधी आयेजकांकडून देण्यात आली.

# दुबईत अडकलेल्या भारतीयांसाठी मालेगावचा सुपुत्र 'देवदूत'

## उद्योजक धीरज जैन यांनी आपल्या फार्म हाऊसचे दरवाजे केले खुले!

**महाईन्यूज । मालेगाव**

**मालेगाव : अमेरिका, इस्रायल-इराण युद्धाच्या छायेत आखाती देशांतील अनेक विमाने रद्द झाल्यामुळे हजारो भारतीय दुबईत अडकून पडले. अशा कठीण परिस्थितीत मालेगावच्या एका उद्योजकाने माणुसकीचे आगळेवेगळे उदाहरण घालून दिले आहे. दुबईस्थित उद्योजक धीरज जैन यांनी आपल्या खासगी फार्म हाऊसचे दरवाजे खुले करून अडकलेल्या भारतीयांसाठी विनामूल्य निवारा,भोजन व अन्य व्यवस्था उपलब्ध करून दिली.**



आखातातील युद्धजन्य परिस्थितीमुळे गेल्या २८ फेब्रुवारी रोजी दुबई येथील विमान उड्डाणे रद्द झाली. उड्डाण रद्द झालेल्या एका भारतीयाला दुबईच्या हॉटेलमध्ये खोली मिळत नाही,अशी माहिती जैन यांना मिळाली. तेव्हा अडकलेल्या आपल्या लोकांसाठी दुबईत सोय करायला हवी, अशी त्यांची भावना झाली व त्यानुसार ते लागलीच कामाला लागले.

तब्बल ३०० जणांची त्यामुळे मोठी सोय होऊ शकली. युद्धासारख्या या बाका प्रसंगात मायभुमीपासून हजारो मैल दूर अंतरावर जैन यांच्या रूपाने मदत करण्यासाठी पुढे आलेली व्यक्ती जणू 'देवदूत' ठरली आहे,अशी भावना दुबईत अडकून पडलेल्या संबंधित भारतीयांची झाली आहे.

युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुबईत अडकून पडलेल्या भारतीयांची निवास व भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात येईल,असा संदेश जैन यांनी प्रारंभी सोशल मीडियावरून प्रसारित केला. त्यानंतर अडकलेल्या भारतीयांकडून मदतीसाठी संपर्क साधणे सुरू झाले. या लोकांशी चर्चा केल्यावर अनेक हॉटेल्समध्ये खोल्या उपलब्ध होत नव्हत्या. तसेच अचानक उद्भवलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे काही लोकांसमोर आर्थिक संकट उभे राहिल्याचे जैन यांच्या निदर्शनास आले. तेव्हा अडकलेल्या भारतीयांसाठी अजमानी येथील आपल्या खासगी फार्महाऊसचे दरवाजे खुले करून जैन यांनी एकाच दिवसात सारी व्यवस्था उभी केली. एवढेच नव्हे तर प्रवाशांना विमानतळ तसेच अडकून पडलेल्या ठिकाणापासून फार्म हाऊसपर्यंत आणण्यासाठी आपली खासगी वाहने त्यांनी धाडली. गेल्या नऊ दिवसात या ठिकाणी भारतातील वेगवेगळ्या राज्यांमधील जवळपास ३०० जणांनी या सोयीचा लाभ घेतला. ही संख्या वाढली तरी अडचण नको म्हणून जैन यांनी सुमारे ५०० लोकांसाठी निवास आणि भोजनाचे नियोजन तेथे करून ठेवले होते.

या मदतकार्यात धीरज जैन यांच्याबरोबर त्यांच्या पत्नी ममता जैन, १४ वर्षांचा मुलगा जैनम आणि ११ वर्षांची मुलगी जीविका यांनी देखील झोकून दिले आहे. गेली ९ दिवस आपले घर सोडून जैन कुटुंबाने आपला मुक्काम या लोकांसमवेत या फार्महाऊसवर हलवला आहे. या ठिकाणी अडकलेल्या भारतीयांच्या आदरातिथ्यात हे कुटुंब मग्न झाले आहे. या लोकांची अजिबात गैरसोय होऊ नये,याची काळजी ते वाहत आहेत. या फार्म हाऊसमध्ये असलेल्या काही खोल्या तसेच तात्पुरत्या स्वरूपात तंबू उभारून लोकांना राहण्यासाठी सोय या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. युद्ध प्रसंगामुळे अडकून पडलेल्या लोकांमध्ये ताणतणाव येऊ म्हणून योगा,खेळ,संगीत,अंताक्षरी अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन या ठिकाणी दररोज केले जाते. पहिल्याच दिवशी ७० भारतीय जैन यांच्या फार्म हाऊसमध्ये दाखल झाले होते. नंतर दिवसागणिक ही संख्या वाढत जाऊन ३०० पर्यंत गेली. आता उड्डाणे सुरू झाल्याने त्यातील काही लोक भारतात परतू लागली आहेत.

### कोण आहेत धीरज जैन?

धीरज जैन हे मूळचे नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्याच्या वडनेर-खाकुर्डी येथील रहिवासी असून व्यवसायानिमित्त दुबईत स्थायिक झाले आहेत. पुण्यात इंजिनियरिंगमधील पदवी घेतल्यानंतर काही काळ त्यांनी युरोपमध्ये नोकरी केली. त्यानंतर २०१६ मध्ये त्यांनी दुबईत स्वतःचा व्यवसाय थाटला. वडनेरचे प्रसिद्ध व्यापारी कांतीलाल जैन यांचे ते चिरंजीव आहेत. ते '१ एक्सेल होल्डिंग्स दुबई' या कंपनीचे चेअरमन असून त्यांचा मुख्य व्यवसाय रिअल इस्टेट डेव्हलपमेंटचा आहे.

# इस्रायलचा कच्च्या तेलाच्या साठ्यांवरच हल्ला; सर्वत्र पसरला काळोख

**महाईन्यूज । अमेरिका**

**इस्रायलने शनिवारी रात्री इराणवर जोरदार हल्ले केले. त्यानंतर रविवारी सकाळी इराणची राजधानी तेहरानच्या आकाशात धुराचे काळे लोट दिसून आले. सकाळी सूर्य प्रकाशाऐवजी तेहरानमधील नागरिकांनी काळोख अनुभवला. धुरामुळे लोक सकाळी खोकल्याने जागे झाले. इस्रायलने इराणची राजधानी तेहरानमधील तेलाच्या साठ्यांवर क्षेपणास्त्र डागले. त्यामुळे आकाशात धुराचे काळे लोट सर्वत्र पसरले होते.**





इस्रायलकडून तेलाच्या साठ्यांवर झालेल्या भीषण हल्ल्यांमुळे इराणच्या काही भागांत ॲसिडचा पाऊस पडला. नेमकं काय घडलं ते जाणून घेऊयात.

अमेरिका-इस्रायल व इराणमध्ये युद्ध सुरू होऊन आता दहा दिवस झाले आहेत. २८ फेब्रुवारीपासून युद्धाला सुरूवात झाली. युद्ध सुरू झाल्यानंतर पहिल्यांदाच इस्रायलकडून शनिवारी (७ मार्च) रात्री तेलाच्या साठ्यांवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यांमुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या प्रतिबॅरलचे भाव ९२.६९ डॉलरवरून वाढून ११४ डॉलरवर पोहोचले आहेत. इस्रायलच्या या हल्ल्याने तेलाचे भाव तर वाढलेच परंतु, इराणमध्ये आरोग्य व पर्यावरणाच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

इराणच्या पेट्रोलियम मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील इंधन साठ्यांवर हल्ले करण्यात आले आहेत. तेहरान व अल्बोर्ज प्रांतातील कच्च्या तेलाच्या साठ्यांना लक्ष्य करण्यात आले. ईशान्य तेहरानमधील अघदासेह तेलाच्या गोदामावर, दक्षिणेतील तेहरान रिफायनरीवर, तेहरानच्या पश्चिमेतील शाहरान ऑइल डेपोवर तसेच कराज शहरातील तेलाच्या डेपोवर हल्ले करण्यात आले. शाहरान डेपोतील तेल रस्त्यांवरून वाहत होते, अशी माहिती समोर आली आहे. तेहरान व अल्बोर्जमध्ये झालेल्या हल्ल्यांत चार टँकर चालकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त 'फार्स'ने दिले आहे. इंधन पुरवठा सुरळीत असून सध्या इराणी सैन्य लढा देत असल्याचे देखील 'फार्स'मध्ये सांगण्यात आले. दरम्यान, तेहरानचे राज्यपाल मोहम्मद सादेघ मोतामेदिन यांनी रविवारी या हल्ल्यांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, हल्ल्यांमुळे काही काळ इंधन पुरवठा खंडीत झाला होता. परंतु, आता समस्या सोडवण्यात आली आहे.

इस्रायलच्या हल्ल्यानंतर तेहरानमध्ये भल्या सकाळी काळोख पसरला होता. आकाशात काळ्या धुराचे लोट पसरल्याने सर्वत्र अंधार पडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### कोणत्या साठ्यांवर हल्ले केले?

इराणच्या पेट्रोलियम मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील इंधन साठ्यांवर हल्ले करण्यात आले आहेत. तेहरान व अल्बोर्ज प्रांतातील कच्च्या तेलाच्या साठ्यांना लक्ष्य करण्यात आले. ईशान्य तेहरानमधील अघदासेह तेलाच्या गोदामावर, दक्षिणेतील तेहरान रिफायनरीवर, तेहरानच्या पश्चिमेतील शाहरान ऑइल डेपोवर तसेच कराज शहरातील तेलाच्या डेपोवर हल्ले करण्यात आले. शाहरान डेपोतील तेल रस्त्यांवरून वाहत होते, अशी माहिती समोर आली आहे. तेहरान व अल्बोर्जमध्ये झालेल्या हल्ल्यांत चार टँकर चालकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त 'फार्स'ने दिले आहे.

# अपूर्वा नेमळेकरची भावूक पोस्ट...

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर हिने नुकतीच आयुष्याच्या नव्या अध्यायाची सुरुवात केली आहे. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी तिने तनुज गोवलकर याच्यासोबत लग्नगाठ बांधली. लग्नानंतर आता हे नवदाम्पत्य हनिमूनसाठी गोवा येथे गेले असून तेथील रोमँटिक फोटो आणि व्हिडिओ अभिनेत्रीने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. हे फोटो सध्या चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अपूर्वा आणि तनुज यांनी १४ फेब्रुवारी म्हणजेच व्हॅलेंटाईन्स डे या खास दिवशी थाटामाटात विवाह केला. लग्नानंतर आता हे दोघे गोव्याच्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर निवांत वेळ घालवत आहेत. समुद्रकिनाऱ्यावर काढलेले त्यांचे फोटो पाहून चाहत्यांनीही या नव्या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.अपूर्वाने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ती पती तनुजचा हात धरून समुद्राच्या लाटांमध्ये फिरताना दिसते. दोघेही अत्यंत आनंदी आणि उत्साही दिसत आहेत. नव्याने लग्न झालेल्या या जोडप्याच्या चेहऱ्यावरचा आनंद त्यांच्या प्रत्येक फोटोमध्ये स्पष्ट दिसून येतो. या या लग्नानंतरची ही त्यांची पहिली सहल असल्यामुळे या फोटोंना विशेष महत्त्व मिळाले आहे. सोशल मीडियावर चाहत्यांकडून या पोस्टला मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंट्स मिळत आहेत. अनेकांनी या जोडप्याला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.अपूर्वा नेमळेकर ही मराठी मालिकांमधील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. तिच्या अभिनयामुळे तिने प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण केले आहे.



# रिहानाच्या घरावर गोळीबार



जगप्रसिद्ध पॉप सिंगर रिहानाच्या घराजवळ गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील बेव्हर्ली हिल्स येथे असलेल्या तिच्या घराच्या गेटवर अज्ञात महिलेने गोळ्या झाडल्या. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. पोलिसांनी तातडीने कारवाई करत गोळीबार करणाऱ्या महिलेचा शोध घेत तिला अटक केली आहे.

लॉस एंजेलिस पोलिस विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी म्हणजेच ८ मार्च रोजी घडली. एका महिलेने रिहानाच्या घराच्या दिशेने सलग गोळीबार केला. या वेळी पाच ते सात गोळ्या झाडण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या गोळ्या घराच्या गेटवर लागल्या, मात्र घराच्या आतपर्यंत पोहोचल्या नाहीत. त्यामुळे घरातील लोक सुरक्षित राहिले. घटनेच्या वेळी घरात लोक उपस्थित होते, मात्र सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. गोळीबार झाल्यानंतर परिसरात तातडीने पोलीस पोहोचले आणि त्यांनी तपास सुरू केला.पोलिसांनी या प्रकरणात संशयित वाहनाचा माग काढला.

तपासादरम्यान एक पांढऱ्या रंगाची टेस्ला कार पोलिसांच्या रडारवर आली. ही कार जवळच्या परिसरात सापडली. त्यानंतर पोलिसांनी कारमधील ३० वर्षांच्या एका महिलेला ताब्यात घेतले आणि तिला अटक केली.

# नव्या अभिनेत्यासोबत मलायका अरोराचा डान्स



बॉलीवूड अभिनेत्री आणि डान्सर मलायका अरोरा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तिचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ती अभिनेता सोराब बेदीसोबत डान्स करताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी हिरे व्यापारी हर्ष मेहता यांच्यासोबत तिचे नाव जोडले जात असताना आता या नव्या व्हिडिओमुळे पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चर्चा सुरू झाली आहे.मलायका अरोराचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच चाहत्यांच्या आणि माध्यमांच्या चर्चेचा विषय राहिले आहे. गेल्या काही महिन्यांपासून तिचे नाव हर्ष मेहता यांच्यासोबत जोडले जात आहे. काही आठवड्यांपूर्वी दोघांचा रोममधील एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. अनेकांनी असा अंदाज लावला की दोघे व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यासाठी रोममध्ये एकत्र गेले होते.दरम्यान आता मलायका अरोराचा आणखी एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने पसरत आहे. या व्हिडिओमध्ये ती 'स्प्लिट्सविला' या कार्यक्रमातील स्पर्धक सोराब बेदीसोबत डान्स करताना दिसते. दोघेही एका पार्टीत मजेत डान्स करताना दिसत असल्यामुळे चाहत्यांचे लक्ष या व्हिडिओकडे वेधले गेले आहे.हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर अनेक चर्चांना सुरुवात झाली. काही नेटिझन्सना वाटत आहे की सोराब बेदी हा कदाचित मलायका अरोराचा नवा बॉयफ्रेंड असू शकतो. मात्र या चर्चांबाबत मलायका अरोरा किंवा सोराब बेदी यांच्याकडून अद्याप कोणतेही अधिकृत विधान करण्यात आलेले नाही. माध्यमांमध्ये आलेल्या वृत्तांनुसार, या दोघांमध्ये कोणतेही प्रेमसंबंध नसल्याचे सांगितले जात आहे. सोराब बेदी अलीकडेच मलायका अरोराच्या नव्या रेस्टॉरंटमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका पार्टीला गेले होते. हा व्हिडिओ त्या पार्टीदरम्यानचा असल्याचे सांगितले जाते. सोराब बेदी यांनीही त्या पार्टीचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले होते.यापूर्वी मलायका अरोरा आणि हर्ष मेहता यांना एका कॉन्सर्टमध्ये एकत्र पाहण्यात आले होते. त्यानंतरही दोघे अनेक वेळा एकत्र दिसले. रोममधील त्यांचा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यामुळे दोघांच्या नात्याबद्दल अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. मात्र या कथित नात्याबद्दलही मलायका अरोराने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.मलायका अरोरा यापूर्वी अभिनेता अर्जुन कपूरसोबतच्या नात्यामुळेही खूप चर्चेत होती. त्या नात्याबद्दल ती खुल्या मनाने बोलत असे. पण सध्या हर्ष मेहता किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसोबतच्या नात्याबाबत ती शांत राहिलेली दिसते.

# टीम इंडियावर बक्षिसांचा वर्षाव!

## विश्वविजेत्या भारताला मिळाले किती कोटी?

महाईन्यूज । अहमदाबाद

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील अंतिम सामन्यात भारताने इतिहासाला गवसणी घातली आहे. २००७ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली, २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली वर्ल्डकप जिंकल्यानंतर आता २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे. या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५६ धावांचे आव्हान ठेवले होते.**




या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा डाव १५९ धावांवर आटोपला. यासह भारताने हा सामना ९६ धावांच्या फरकाने जिंकला. या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय संघावर पैशांचा पाऊस पाडला गेला आहे. तर उपविजेता न्यूझीलंडचा संघ देखील मालामाल झाला आहे.

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी आयसीसीकडून बक्षिसासाठी एकूण १३.५ मिलियन डॉलर्स म्हणजे १२३.७७ कोटी रुपये रक्कमेची घोषणा करण्यात आली होती. ही रक्कम गेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील रकमेपेक्षा २० टक्के अधिक आहे. भारताने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला होता. त्यावेळी भारतीय संघाला २.२४ मिलियन आणि अंतिम सामना गमावणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला १.२८ मिलियन डॉलर्स इतकी रक्कम बक्षीस म्हणून दिली गेली होती.

### विजेते ते सहभागी संघांना किती कोटींची बक्षिसे

- वर्ल्डकप विजेत्या भारतीय संघाला बक्षीस म्हणून ३ मिलियन डॉलर्स म्हणजे २७.४८ कोटी रुपये बक्षीस म्हणून दिले गेले आहेत.
- अंतिम सामन्यात पराभूत झालेल्या न्यूझीलंड संघावरही पैशांचा पाऊस पाडला गेला आहे. उपविजेत्या न्यूझीलंड संघाला १.६ मिलियन डॉलर्स म्हणजेच १४.६५ कोटी रुपये दिले गेले आहेत.
- विजेत्या उपविजेत्या संघांसह सेमी फायनल गमावणाऱ्या संघांनाही बक्षिसाची रक्कम दिली गेली आहे. दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या दोन्ही संघांना ७,९०,००० डॉलर्स म्हणजे ७.२४ कोटी रुपये दिले गेले आहेत.
- या स्पर्धेतील सुपर ८ मध्ये प्रवेश करणाऱ्या पण सेमी फायनलमध्ये प्रवेश न करू शकलेल्या संघांना ३,८०,००० डॉलर्स म्हणजे ३.४८ कोटी रुपये दिले गेले आहेत.
या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या संघांना प्रत्येकी २,५०,००० डॉलर्स म्हणजे २.२९ कोटी रूपये मिळाले आहेत.

## सूर्यकुमार यादवने विजयानंतर निवृत्तीबाबत केलं मोठं वक्तव्य

महाईन्यूज । अहमदाबाद

**भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने घरच्या मैदानावर टी-२० विश्वचषकाचं जेतेपद पटकावलं. भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देणारा तो तिसरा कर्णधार ठरला. कर्णधार म्हणून त्याच्या पहिल्याच विश्वचषकात विश्वविजेता बनून त्याने एमएस धोनीची बरोबरी केली आणि रोहित शर्मालाही मागे टाकलं. देशभरात भारतीय संघाचं कौतुक होत केलं जात आहे.**




### सूर्यकुमार यादव विजयानंतर निवृत्ती घेणार?

कॅप्टन सूर्यकुमार यादवने निवृत्तीबद्दलच्या प्रश्नांवर हसून उत्तर दिले, "भावा, निवृत्तीचा विचार का करायचा? सगळं काही ठीक चाललंय." त्यांनी त्यांच्या भविष्यातील योजनांबद्दल देखील यादरम्यान सांगितलं आहे. सूर्यकुमार यादवला सातत्याने केलेल्या कामगिरीच्या बळावर फार उशिरा भारतीय संघात संधी मिळाली. सूर्या सध्या ३५ वर्षांचा असला तरी त्याने सातत्यपूर्ण चांगली कामगिरी करत संघाचं नेतृत्त्वदेखील उत्तम केलं आहे.

दरम्यान अंतिम सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत कर्णधार सूर्यकुमार यादवनेही त्याच्या निवृत्तीबद्दल सुरू असलेल्या चर्चांवर स्पष्ट उत्तर दिलं. माध्यमांमध्ये सुरू असलेल्या विविध चर्चांबाबत त्याला प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्याने त्यावर सविस्तर प्रतिक्रिया दिली.

२०२४ च्या टी-२० विश्वचषकानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांनी निवृत्ती घेतली होती. या तीन दिग्गज खेळाडूंच्या निवृत्तीनंतर भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आणि नव्या खेळाडूंना संधी देत एक नवीन संघ तयार करण्यात आला होता. त्यानंतर सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. आता सूर्याने त्याच्या निवृत्तीसंबंधित चर्चांवर पत्रकार परिषदेत स्पष्ट उत्तर दिलं असून त्याने त्याच्या भविष्यातील योजनांबाबतही सविस्तर माहिती दिली.

टी-२० विश्वचषक विजयानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पत्रकार परिषदेत हजेरी लावली. यावेळी त्यांनी माध्यमांच्या अनेक प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. कर्णधाराने त्याच्या भविष्यातील योजना स्पष्ट करत सांगितलं की तो कुठेही जाणार नाही आणि संघासाठी खेळतच राहणार आहे. त्याचं पुढील लक्ष्य आता ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणं आणि पुढील विश्वचषक जिंकणं हे आहे. दरम्यान पत्रकार परिषदेत संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि वरुण चक्रवर्ती यांच्याबद्दलही अनेक प्रश्न विचारण्यात आले, ज्यावर कर्णधाराने सविस्तर उत्तरं दिली.

सूर्यकुमार यादवने भविष्यातील योजनांबद्दल बोलताना सांगितलं, "पुढचं लक्ष्य आता २०२८मध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक आणि टी-२० विश्वचषक जिंकणं हे आहे." सूर्याने हे वक्तव्य करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याच्या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आणि त्या अफवांना पूर्णविराम दिला.

दरम्यान भारताने वर्ल्डकप जिंकल्यानंतर सूर्यकुमार यादवने अहमदाबादच्या खेळपट्टीचे आभार मानले. सूर्याने अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमच्या खेळपट्टीवरील माती कपाळावर लावली आणि हाताला किसदेखील केलं. यापूर्वी कर्णधार रोहित शर्मानं २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजयानंतर बार्बाडोसमधील खेळपट्टीची चव चाखताना दिसला होता. आता सूर्यानेही अशीच एक कृती केली, ज्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आणि तो क्षण चाहत्यांसाठी विशेष ठरला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
दि. 10 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत छंद जोपासावेत : उपमहापौर शर्मिला बाबर

## विविध कार्यक्रमांद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्याला प्राधान्य देत जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या आरोग्याकडे आणि वैयक्तिक आयुष्याकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कामाच्या धकाधकीत अनेकदा महिला स्वतःकडे दुर्लक्ष करतात, मात्र निरोगी शरीर आणि सकारात्मक मन असेल तरच त्या कुटुंब, समाज आणि कार्यस्थळी अधिक सक्षमपणे योगदान देऊ शकतात. त्यामुळे महिलांनी आपल्या दैनंदिन दिनक्रमात आरोग्याची काळजी घेणे, नियमित व्यायाम करणे आणि मानसिक तणावापासून दूर राहण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत आवडत्या गोष्टींमध्ये वेळ घालवावा. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी ऊर्जा आणि सकारात्मकता मिळू शकेल, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.**



जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मनोगत व्यक्त करताना उपमहापौर शर्मिला बाबर बोलत होत्या.

या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, पल्लवी वाल्हेकर,प्रियांका कुदळे यांच्यासह सहआयुक्त मनोज लोणकर, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उपआयुक्त चेतना केरूरे, संदीप खोत, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका महिला अधिकारी,महिला कार्यकारी अभियंता तसेच कर्मचारी उपस्थित होत्या.

महिला दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात महापालिकेच्या कर्मचारी महिलांच्या गुणदर्शन कार्यक्रमाने करण्यात आली. यामध्ये कर्मचारी वर्गाने समुह नृत्य सादर केले. तर लकी ड्रॉ मध्ये पैठणीचे बक्षिस आणि सोलो डान्स देखील यावेळी महिलांनी सादर केला. याशिवाय, महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या दुपारच्या सत्रात महापालिकेच्या महिलांसाठी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप खोत यांनी तर सुत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार प्रमोद जगताप यांनी मानले.

## सातत्यपूर्ण उपक्रमांची गरज : विरोधी पक्षनेता



महिला सक्षमीकरण ही केवळ घोषणांपुरती मर्यादित राहू नये, तर त्यासाठी सातत्यपूर्ण उपक्रमांची गरज आहे. त्यामुळे पुढील वर्षी साजऱ्या होणाऱ्या जागतिक महिला दिनाचे नियोजन आतापासूनच करण्याचा मानस आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच महिलांना विचार मांडता येतील, त्यांच्या समस्या आणि अनुभवांवर मोकळेपणाने चर्चा होईल, अशा विचारमंथनपर कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाईल. तसेच महिलांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे उपक्रम राबविण्यात येतील. महिलांसाठी समुपदेशन, व्यक्तिमत्व विकास, आरोग्य जागरूकता तसेच कार्यस्थळी येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येईल. पुढील महिला दिन अधिक अर्थपूर्ण आणि उपयुक्त ठरावा यासाठी आतापासूनच सविस्तर अहवाल तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम आखले जातील. महिलांना सक्षम, आत्मविश्वासू आणि समाजजीवनात अधिक सक्रिय बनविण्यासाठी महानगरपालिका स्तरावर सातत्याने सकारात्मक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न राहील, असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले.

## महिला कर्मचारी भगिनींसारख्या : स्थायी समिती सभापती



स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, महापालिकेत कार्यरत असलेल्या सर्व महिला कर्मचारी माझ्यासाठी भगिनींसारख्या आहेत. त्या विविध विभागांमध्ये जबाबदाऱ्या पार पाडत शहराच्या प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत असतील किंवा कोणत्याही बाबतीत सहकार्याची आवश्यकता भासत असेल, तर त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून मदत करण्यासाठी मी व माझे सहकारी पदाधिकारी सदैव तत्पर आहोत. महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि सकारात्मक कार्यपरिसर मिळणे ही प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे. महानगरपालिकेतील महिला कर्मचारीही आपल्या प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ कामामुळे शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव करत सभापती बारणे यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# पीएमआरडीएचे प्रकल्प अजूनही रखडले

## रिंगरोड, नदी सुधारणा, लोणावळा स्कायवॉकसह अनेक योजना दीड वर्षांनंतरही कागदावरच

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून साधारणत: गेल्या दीड वर्षापूर्वी सात मोठे प्रकल्प राबविण्याचा निर्णय झाला होता; मात्र अद्यापही यापैकी एकाही प्रकल्पावर कार्यवाही झालेली नाही. भूसंपादन, निवीदा प्रक्रिया आणि अंतिम अहवाल अशा वेगवेगळया कारणांमुळे हे प्रकल्प अद्याप कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.**




> अनेक प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. काही प्रकल्प हे निविदा प्रक्रियेत आहेत. त्यापैकी काही प्रकल्प हे येत्या वर्षभरात पूर्ण होतील. मेट्रो आणि रिंगरोड प्रकल्पाला गती मिळाली आहे. निश्चित हे प्रकल्प पूर्णत्वास जाणार आहेत.
>
> डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

### सोळू ते वाघोली काम रखडलेले

वाहतूक कोंडीचा सुटका देणारा जिल्ह्यातील सर्वाधिक मोठा प्रकल्प म्हणून रिंगरोड कडे पाहिले जाते. त्यात 96 प्रोजेक्ट असून, त्याचा पहिला टप्पा म्हणजे सोळू ते वाघोली या दरम्यान अद्याप पूर्ण होवू शकला नाही. भूसंपादन तसेच, काही शेतकऱ्यांचा विरोध असल्याने हा प्रकल्प अद्याप रखडला असल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात सोलू ते वडगाव शिंदे हा 4.7 किलोमीटरचा पहिला टप्पा आहे. वेगवेगळया विभागाशी संबंधित जागा व भूसंपादन रखडले आहे.

### नदी सुधार प्रकल्प आणि लोणावळा स्काय वॉक

नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत इंद्रायणी, पवना आणि मुळामुठा या महत्त्वाच्या नद्यांची प्रदूषण कमी करण्यासाठी तसेच, परिसराचा विकासाच्या दृष्टिने हा प्रकल्प राबविण्यात आला होता. यासाठी पीएमआरडीएला दिल्लीचे दारे ठोठावली देखील लागली होती. मात्र, अद्याप ते प्रत्यक्षात सुरु झालेले नाहीत. लोणावळा टायगर आणि लायन्स पाईंट येथील ग्लास स्कॉयवॉक, जिल्ह्यातील विविध ठिकाणी 11 फायर स्टेशन, देहू घाट, फुटबॉल टफ, वाघोली वॉटर सप्लाय असे विविध प्रकल्प हे अद्याप कागदावरच आहे.

### जंक्शन सुधारणा

जिल्ह्यात 17 ठिकाणी जंक्शन सुधारणा करण्यात येणार होती. जेणेकरुन वाहतूक स्थिती व कोंडी सुधारण्यास मदत होईल. मात्र, यासाठी विस्तृत अहवाल झाला नाही. तसेच, त्यावर कार्यवाही न झाल्याने 2 वर्षाचा हा प्रोजेक्ट कागदावरच आहे. तसेच, पार्किंग संदर्भात मल्टी मॉडेल हबची संकल्पना राबविण्यात आली होती. हा प्रकल्प 370 कोटी रूपये खर्चाचा आहे. प्रत्यक्षात जागाचे संपादन, कायदेशीर अडचणी त्यामुळे हा प्रकल्प देखील प्रकल्प पुढे सरकला नाही.

# राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक संघ उपविजेता

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटनेच्या वतीने संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निक कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथे आयोजीत केलेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग घेतला होता. यापैकी अंतिम सामन्यात अहिल्यानगर येथील नेप्ती पॉलिटेक्निकच्या संघाने १९ गोल केले तर पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या (पीसीपी) संघाने १० केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक उपविजेत्या मुलांच्या फुटबॉल संघात अनिकेत खोसे, राजवीर आखाडे, रवीतेज यादव, सागर माळगी, यश नगरे, हर्ष गंगावणे, सर्वेश धनावडे, परीक्षित पोवार, जय क्षेत्री आणि क्षितिज पवार यांचा समावेश होता.

विजयी संघाला संघ व्यवस्थापक पी. एल. देवतळे, हरिश नागले, गणेश पेंदोर, क्रिडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थकुरडे, प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड यांनी मार्गदर्शन केले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, युवा उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले.

> पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निकच्या मुलांनी राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून उपविजेत्या पदाचा मान मिळविला आहे. त्यांच्या मेहनतीला व समर्पणाला आम्ही सन्मान देतो आणि भविष्यात आणखी मोठ्या यशाची अपेक्षा करतो.
>
> - डॉ. गिरीश देसाई, कार्यकारी संचालक.

# संत साई इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये महिला दिन उत्साहात

## शिक्षण विश्व : विद्यार्थी-शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पुणे**

**संत साई इंग्लिश मिडियम स्कूल, जुळे, सोलापूर येथे शाळेच्या प्रांगणात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका श्वेता नारायणगावकर यांनी केले. त्यांनी महिला दिनाचे महत्त्व आणि तो का साजरा केला जातो याबद्दल उपस्थितांना माहिती दिली.**







या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शाळेची माजी विद्यार्थिनी डॉ. साक्षी बोचरे (एस.एस.सी बॅच २०१५, एम.बी.बी.एस.) उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. साक्षी बोचरे यांचा परिचय देऊन मुख्याध्यापक श्री. ढवळेश्वर सर यांनी त्यांचा सत्कार केला. यानंतर शाळेचे चित्रकला शिक्षक संजय अनार्थे सर यांनी स्त्रीतत्त्वाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.

तसेच, शिक्षिका पूजा पावटेकर, रिया पोतदार, मालन लिगाडे, कोमल वाबळे, सुहासिनी बदोले यांनी महिला शिक्षकांसाठी खेळांचे आयोजन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज वाबळे सर आणि भारती ढवळेश्वर मॅडम यांनी सहकार्य केले, तर पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी सौ. पूजा गव्हाणे, सौ. सुवर्णा खोंडे, सौ. मीरा शर्मा, सौ. पल्लवी भिसे उपस्थित होते. अशा प्रकारे उत्साहपूर्ण वातावरणात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

### स्त्रीयांचा सन्मान राखणे प्रत्येकाची जबाबदारी

भंडारकवठे विकास मंच आणि गुरु फॉर लाईफ फाउंडेशन, जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी आयोजित केलेल्या 'समाज भूषण' पुरस्कार वितरण सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाबद्दल शाळेच्या संस्थापिका व मुख्याध्यापिका सौ. सुनीता ढवळेश्वर यांना 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सौ. स्वाती मोघे यांनी त्यांचा परिचय करून देत शिक्षण आणि कार्याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे सन्माननीय मुख्याध्यापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी स्त्रियांचा सन्मान राखणे आणि त्यांना समान संधी देणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.



# महिलांना ‘लेडी सिंघम’ पुरस्काराने गौरविले

## चिखली येथील IIBM कॉलेजमध्ये महिला दिन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून चिखली येथील 'आयआयबीएम' (IIBM) कॉलेजमध्ये महिलांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावर्षी संस्थेच्या वतीने महिलांना आगळ्यावेगळ्या ‘ *लेडी सिंघम’* सन्मानाने सन्मानित करण्यात आले. समाजात वावरताना महिलांनी अधिक धाडसी आणि कणखर बनावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.**



या कार्यक्रमात कॉलेजच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका, स्थायी समिती सदस्या व कॉलेजच्या संचालिका सौ. शितलताई धनंजय वर्णेकर, नगरसेविका सौ. सोनमताई विनायक मोरे, विभागप्रमुख कु. प्रतिक्षा डफळ, डॉ. गरिमा मलिक आणि प्रोफ. भारती चौगुले, कु. सपना गोरे, विद्यार्थिनी कु. अंकिता कंकणवाडी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह म्हणून महिलांना गॉगल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला कॉलेजचे प्राचार्य श्री. प्रदीप फुलकर, विभागप्रमुख श्री. अमोल भागवत, श्री. अनिकेत वंजारी, श्री. संदीप जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. केवळ कर्मचारीच नव्हे, तर विद्यार्थिनींनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. "भविष्यात सिंघमसारखे धाडस ठेवून स्वतःचे भविष्य घडवा," अशा शुभेच्छा यावेळी विद्यार्थिनींना देण्यात आल्या. या प्रेरणादायी उपक्रमामुळे महिला कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, अशा कार्यक्रमांमुळे कामाची नवी ऊर्जा मिळते आणि भविष्यात मोठी झेप घेण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

> विद्यार्थिनींनी स्वतःची स्वप्ने बाजूला न ठेवता ती पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्न करावेत व आपल्या आईचे एक स्वप्न तरी आपण पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत विद्यार्थिनीना आणि महिलांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.
>
> — शितलताई वर्णेकर, संचालिका, IIBM कॉलेज.

> आजच्या काळात महिलांनी केवळ शिक्षित होऊन चालणार नाही, तर त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ‘सिंघम’सारखे धाडसी होणे काळाची गरज आहे. IIBM संस्थेचा हा ‘लेडी सिंघम’ उपक्रम महिलांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आहे. महिलांनी आपल्यातील शक्ती ओळखून प्रत्येक क्षेत्रात निर्भयपणे पुढे यावे.
>
> — कु. प्रतिक्षा डफळ, विभागप्रमुख, आय आय बी एम कॉलेज.


